कल्याण वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५८ /२०२६ दि. १४ /०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोंबिवली महानगर पालीका, स्मार्ट सिटी अंर्तगत बैलबाजार, (वल्लीपीर) ते म.फुले चौक दरम्यान फ्लायओव्हर ब्रिजचे काम चालु आहे. सध्या सुभाषचंद्र बोस चौक ते ताल बार दरम्यान उड्डणपुलाचे RE Wall व उर्वरीत कामे करणार असुन सुभाषचंद्र बोस ते ताल बार पर्यतंचा एकपदरी रस्ता हा नागरीकांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने रहदारीसाठी बंद करून विकासकामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे सदर परीसरातील काही रस्ते बंद करणार असून काही रस्ते एकदिशा मार्ग करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) महात्मा फुले चौक, ताल बार मार्गे सुभाषचंद्र बोस चौकाकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **ताल बार** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ताल बार येथुन डावे वळण घेवुन स्मार्ट किड्स नर्सरी स्कुल येथुन रामबाग लेन १,२,३, मार्गे तसेच राम गणेश गडकरी पथ मार्गे सरळ म्हसकर हॉस्पीटल कडुन मार्गक्रमण करुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) शहाड व वालधुनी मार्गे महात्मा फुले चौकाकडे जाणाऱ्या वाहीनीवरून सर्व वाहनांना **सुभाष चंद्र बोस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने महात्मा फुले चौक कडुन सुभाषचंद्र बोस चौक कडे येणाऱ्या रस्त्याचे वाहणीवरुन मार्गक्रम करुन महात्मा फुले चौक, स्टेशन परीसर येथे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) संतोषी माता रोड मार्गे रामबाग लेन नं ०,१,२,३ कडुन ताल बार कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **शिवसेना कार्यालय, लेन नं ०, रामबाग** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने संतोषी माता रोड मार्गे तसेच शिवसेना कार्यालय येथे डावे वळण घेवुन राम गणेश गडकरी पथ मार्गे सरळ म्हसकर हॉस्पीटलकडुन मार्गक्रमण करुन इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक १६/०३/२०२६ रोजी पासुन काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर व महानगरपालिका
– मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी.
– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
– विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर/भिवंडी

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ, कल्याण वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण वाउपवि.